# अदानीच्या वीजग्राहकांना मागील महिन्यानुसार बिल

मुंबई : मुंबई उपनगरात वीजपुरवठा करणाऱ्या अदानी कंपनीने कर्मचाऱ्यांना वीजमीटर घेण्यासाठी घरोघरी न पाठवण्याचा निर्णय घेतला असून फेब्रुवारीतील वीजवापर गृहीत धरून मार्च महिन्यासाठी वीज देयक पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. वीज देयक तयार करण्यासाठी अनेकांना ठिकठिकाणी जाऊन वीजमीटर वाचन करावे लागते. मात्र सध्या करोनाच्या पार्श्वभूमीवर तसे न करता मागील महिन्याइतकेच वीजदेयक पाठवण्याचे अदानी कंपनीने ठरवले आहे. परिस्थिती सुरळीत झाल्यानंतर पुढील महिन्यात त्याबाबतचा ताळमेळ घालण्यात येईल.